**MHLA**050000492020

**विशेष दिवाणी दावा क्र.०३/२०२०**
**नरसिंग वि. अनिता वगैरे**

## नि.३० वरील आदेश

दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादीने दावा दुरुस्तीसाठी हा अर्ज केला आहे.

२. प्रतिवादींनी अर्जावर म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध केला आहे व अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला. वादीतर्फे कथन व युक्तिवाद असा की दावा निशाणी क्र.१ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये प्रतिवादी क्र.१ चे वडील धोंडिबा यांना जी मिळकत वाटणीत आली त्याबाबत कथन केलेले आहे. त्यामध्ये नजरचुकीने १८ फुट पूर्व बाजूने असे लिहण्यात आलेले आहे. ते शब्द कमी करण्यात आले यासाठी हा अर्ज केलेला आहे. हा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही. प्रतिवादींतर्फे युक्तिवाद असा की सदरचा दावा वादीच्या पुराव्यासाठी असतांना हा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. त्यामुळे ता नामंजूर करावा.

४. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीमधील वादी व प्रतिवादी यांचे हक्क व अधिकार याबाबत दाखल केलेला आहे. या प्रकरणी अदयापही वादीचा पुरावा सुरू झालेला नाही. प्रस्तावीत दुरूस्तीचे स्वरूप पाहता ती मंजूर केल्यास

दावामिळकतीमध्ये अथवा दाव्याच्या स्वरूपामध्ये कसलाही बदल होणार नाही. प्रतिवादीस त्याबाबत पुरावा देण्याची व वादीचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही. म्हणून हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

अर्ज मंजूर केला आहे. वादीने प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस करुन घ्यावी.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.03.26 15:53:17 +0530

( प्र.अ.सवदीकर )

दि.२६/०३/२०२२ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अहमदपुर

...